

# कायदा

माणूस जेव्हा सामाजिक प्राणी बनला, समाज म्हणून एकत्र राहू लागला तेव्हा समाजाच्या एकोप्यासाठी, समाजातील शांततेसाठी, समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी मानवी वर्तनाचे काही नियम त्यांनी बनवले. इतरांना आणि समाजाला त्रास होईल असं वर्तन माणसाने करू नये असा सर्वसाधारण दृष्टिकोन त्यामागे होता. पुढे माणसाचं जीवन गुंतागुंतीचं बनत गेलं, व्यवहाराचं स्वरूप बदलत गेलं आणि त्याला अनुसरून कायदेकानून बनत गेले. कायद्याच्या विरुद्ध वर्तन करणाऱ्यांना दंड व शिक्षा अस्तित्वात आल्या. अशा समाजात ‘कायद्याचं राज्य’ आहे असं मानलं जातं, आणि असं राज्य अस्तित्वात यावं हे प्रत्येक समाजाचं स्वप्न असतं.

कायदा म्हटलं की, न्यायदेवतेचं चित्र आपल्यासमोर येतं. या न्यायदेवतेच्या डोळ्यावर पट्टी बांधलेली आहे आणि तिच्या हातात तराजू आहे. न्यायदेवतेच्या डोळ्यावरची पट्टी हे सदसद्‌विवेकाचं प्रतीक आहे. कोणताही पूर्वग्रह न ठेवता वस्तुनिष्ठपणे न्यायदानाचं हे प्रतीक आहे. न्यायदेवतेच्या हातातील तराजू हे सर्वांना समान न्यायाचं प्रतीक आहे त्याचप्रमाणे समतोल न्यायाचं प्रतीक आहे, नीरक्षीर विवेकाचं प्रतीक आहे. ‘दूध का दूध...पानी का पानी...’ या तत्त्वाचं प्रतीक आहे. थोडक्यात, कायद्यासमोर सर्व समान असतं, कायदा दुजाभाव करत नाही, कायदा भेदभाव मानत नाही, कायदा वस्तुनिष्ठ असतो, पूर्वग्रहांवर आधारित न्याय तो करत

नाही. ही कायद्याची मूलभूत तत्त्वं आहेत.



आज आपण पाहतो की, समाजाच्या हिताचे, समाजाच्या भल्याचे अनेक कायदे आपल्यापाशी आहेत. स्थानिक न्यायालयांपासून सर्वोच्च न्यायालयांपर्यंत न्यायदानाची व्यवस्था आहे, कायदा व सुव्यवस्थेचं रक्षण करणाऱ्या यंत्रणा आहेत आणि तरीदेखील एकूणच कायदा-सुव्यवस्था व न्याय याबद्दल समाजात बऱ्याच प्रमाणात असमाधान आहे. कायदा सर्वांकरता समान असताना त्याच्या अंमलबजावणीत दुजाभाव होत असल्याचा सर्वसाधारण समज लोकांमध्ये आढळतो. न्याय गरिबांकरता नाही. सर्वसामान्यांकरता नाही, असे उद्‌गार ऐकू येतात. न्याय प्रक्रियेतील क्लिष्टपणा, दिरंगाई यामुळे न्यायालयांची पायरी चढण्याची लोकांची तयारी नसते. एकूणच 'कोर्टाची पायरी चढू नये' असं सर्वसामान्य लोक मानत असतात. कोर्टाची पायरी चढण्यापेक्षा होणारा अन्याय निमूटपणे सहन करणं ते पसंत करतात. त्यामुळे कायदे असूनही, नियम असूनही, कायद्याचं रक्षण करणाऱ्या व न्यायदानाचं कार्य करणाऱ्या संस्था असूनही खऱ्या अर्थाने 'कायद्याचं राज्य' आपण स्थापित केलं आहे का? स्थापित करू शकलो आहोत का? हा प्रश्न आपण आपल्यालाच विचारला पाहिजे.

लहानपणापासून कायद्याचं एक तत्त्व मी ऐकत आलो आहे; ते म्हणजे, शंभर अपराधी सुटले तरी चालतील पण एका निरपराध माणसाला शिक्षा होऊ नये. हे योग्यच आहे, पण अपराधी सुद्धा सुटता कामा नयेत. अपराध्यांना शासन करणं हे कायद्याचं कर्तव्य आहे. प्रत्यक्ष व्यवहारात आपण पाहतो की, अपराधी मंडळी शिक्षेपासून बचावासाठी नाना तऱ्हेच्या खटपटी-लटपटी करतात आणि त्याकरता कायद्याच्या तरतुदींमधील व न्यायप्रक्रियेमधील पळवाटा शोधतात. या वर्तनामुळे समाजात कायद्याचा धाक उरला नसल्याचं चित्र तयार होतं. आज ज्या तऱ्हेने न्यायदानाला विलंब होताना दिसतो, न्यायालयांमध्ये साठलेल्या खटल्यांची संख्या वाढताना दिसते त्यामुळे कायद्याच्या या तत्त्वात, 'शंभर निरपराध लोकांना शिक्षा झाली तरी चालेल, परंतु एक अपराधी सुटता कामा नये' असा बदल केला पाहिजे, असं मला म्हणावसं वाटतं.

अलीकडच्या काळातील एक उदाहरण माझ्यासमोर आहे. रशियात चेचेन्या प्रांतातील काही बंडखोरांनी एका प्रेक्षागृहाचा कब्जा घेऊन शेकडो प्रेक्षकांना ओलीस ठेवून सरकारवर त्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी दबाव आणला होता. रशियाच्या सरकारने बंडखोरांच्या मागण्या मान्य न करण्याचा निर्णय घेतला व त्यांच्या विरोधात कडक कारवाई केली. या कारवाईत बंडखोरांनी ओलीस धरलेल्या अनेक प्रेक्षकांना प्राण गमवावे लागले परंतु एकही बंडखोर सुटला नाही, सर्व बंडखोरांचा खातमा झाला. रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्या या निर्णयाबद्दल खूप टीका झाली, पण त्याचबरोबर बंडखोरांची गय न केल्याबद्दल त्यांची प्रशंसाही झाली. मला एवढंच म्हणायचं आहे की अपराधी हा नेहमीच स्वतःच्या बचावासाठी निरपराध लोकांची ढाल पुढे करत असतो. स्वतःच्या बचावासाठी कायद्याला धाब्यावर बसवण्याची व न्यायालयीन प्रक्रियेला वेठीस धरण्याची ही त्याची तयारी असते. अपराधी मंडळींच्या या खेळ्यांमुळे कायद्या समोरच प्रश्नचिन्ह उभं राहतं.

असं म्हटलं जातं की, 'जस्टीस डिलेड् इज जस्टीस डिनाइड', 'न्यायाला विलंब म्हणजे न्यायाला नकार'. आज स्थानिक न्यायालयांपासून सर्वोच्च न्यायालयांपर्यंत प्रलंबित खटल्यांची संख्या हजारो-लाखोंपर्यंत पोहचलेली असताना असं म्हटलं जातं की, पुढच्या पंचवीस वर्षात एकही नवीन प्रकरण न्यायालयासमोर आलं नाही तरीही सगळी न्यायालयं चालू राहतील. इतक्या मोठ्या संख्येने न्यायप्रविष्ट प्रकरणं प्रलंबित असतील, तर आपल्यासारख्या सामान्य लोकांना न्यायापासून वंचितच राहावं लागेल, अशी एकंदरीत परिस्थिती आहे.

या संदर्भात अनेक जणांशी वेळोवेळी चर्चा करताना ज्या उपाययोजना मला मौलिक वाटल्या, उपयुक्त वाटल्या त्या मला मांडाव्याश्या वाटताहेत. त्यापैकी एक म्हणजे, शंभर निरपराध्यांना शिक्षा झाली तरी चालेल पण एक अपराधी सुटता कामा नये, अशा प्रकारचा बदल कायद्याच्या तत्त्वात आपण केला पाहिजे.

एखाद्या प्रकरणात वारंवार तारखा पडत गेल्यामुळे न्यायालयीन प्रक्रिया लांबते व न्यायाला विलंब होतो. बऱ्याचदा वकील मंडळी त्यांच्यावर कामाचा भार मोठा असल्याने तारखा वाढवून मागत असतात. प्रत्येक वकिलाकडे अनेक प्रकरणं साठलेली असतात. त्यामुळे प्रत्येक वकिलाकडे ठराविक कालावधीत किती प्रकरणं असावीत याबाबतीत नियम केला गेला पाहिजे. त्याचप्रमाणे एका वकिलाला एका प्रकरणात जास्तीत जास्त किती वेळा तारखा मागता येतील व न्यायालयाला त्यांचा विचार

करता येईल याची मर्यादा निश्चित करणाराही नियम केला गेला पाहिजे. यामुळे वकिलांकडून मागितल्या जाणाऱ्या तारखांच्या टक्केवारीत खूप घट होऊ शकेल. त्याचप्रमाणे वकील मंडळीसुद्धा क्वान्टिटीपेक्षा क्वालिटीवर भर देऊ लागतील. पर्यायाने न्यायदानाचं काम सुकर होईल. याचबरोबर न्यायालयांची संख्या वाढवली पाहिजे. तसंच न्यायाधीशांची संख्या वाढवली पाहिजे, जेणेकरून प्रलंबित खटल्यांचं प्रमाण कमी होऊ शकेल.

आधी म्हटल्याप्रमाणे आपल्याकडे विविध प्रकारचे फायदे आहेत. गरजेनुसार आणखी नवे कायदे होत असतात, कायद्यांमधील तरतुदींमध्ये नवे बदल केले जात असतात. कायद्यातील तरतुदींच्या संदर्भात त्यांच्या इंटरप्रिटेशनवरून-अर्थावरून दावे-प्रतिदावे केले जातात, त्या संदर्भात स्पष्टीकरण मागणारे खटले न्यायालयामध्ये दाखल होत असतात. न्यायालयीन प्रक्रियेचा हा एक भाग आहे व ते टाळता येणे शक्य नसते. माझ्या मते, न्यायदानाचा समावेश अत्यावश्यक सेवांमध्ये केला गेला पाहिजे व इतर अत्यावश्यक सेवांप्रमाणे, उदा. हॉस्पिटल, अग्निशमन दल, पोलीस यंत्रणा वगैरे, न्यायालयेसुद्धा २४x७ उपलब्ध राहिली पाहिजेत. ती वेगवेगळ्या शिफ्ट्समध्ये चालली पाहिजेत व अशा प्रकारे शिफ्ट्समध्ये काम करण्याची तयारी वकिलांनी ठेवली पाहिजे व पक्षकारांनीही त्या त्या वेळी सुनावणीला हजर राहीलं पाहिजे व या पद्धतीचे व्यवस्थित नियोजन झालं तर प्रलंबित खटल्यांचं प्रमाण कमी होऊ शकेल व न्यायदानातील विलंब बऱ्याच अंशी दूर होईल.

न्यायालयीन निकालावरील अपील ही आणखी एक महत्त्वाची बाब आहे. एखाद्या न्यायालयाने दिलेल्या निकालाबाबत वादी किंवा प्रतिवादीचे समाधान झालं नसेल तर त्याला त्याच्या वरच्या न्यायालयात दाद मागता येते, याला 'अपील' म्हणतात. अपील न्यायालयांमध्येही अनेक प्रकरणं प्रलंबित असल्याचे आढळून येते. या दृष्टीने, अपिलांची संख्या कमी करता येणं शक्य आहे का? मुळात एखाद्या प्रकरणात खालच्या न्यायालयातच काटेकोर हाताळणी होऊन, साधक-बाधक चर्चा होऊन, कायद्याच्या कलमांचा योग्य प्रकारे अवलंब करून न्याय दिला गेला पाहिजे. वरच्या कोर्टामध्ये अपिलांमध्ये खालच्या कोर्टात पुढे आलेल्या कायदेशीर मुद्द्यांवर चर्चा होते, हे मुद्दे जितके कमीत कमी राहतील. तितकी अपील लवकर निकालात निघतील. त्याचप्रमाणे एखादे प्रकरण अपिलयोग्य आहे की नाही याचा निर्णय वरच्या कोर्टांनी तात्काळ केला पाहिजे त्यामुळे अत्यावश्यक अपिलांची संख्या कमी होईल.


बऱ्याचदा खालच्या न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेची अंमलबजावणी टाळण्यासाठी किंवा ती पुढे ढकलण्यासाठी अपीलांच्या तरतुदींचा उपयोग केला जातो, अपील जितका काळ चालेल तितका काळ आरोपी मुक्त राहू शकतो. कायद्याचा वचक किंवा धाक न वाटण्याचं हे एक कारण आहे. अपील दाखल करून घेण्याच्या बाबतीत न्यायालयांनी त्वरित पाऊल उचललं, तर ही पळवाट बंद होऊ शकेल, कायद्याचा धाक निर्माण होईल व गुन्हेगार गुन्हे करण्यास कचरतील. आज होतं असं की, गुन्हा आज होतो, त्याचा निकाल लागेपर्यंत अनेक वर्षं लोटतात, त्यात जरी शिक्षा झाली तरी आरोपी अपीलात जातो आणि आणखी कितीतरी वर्षं निघून जातात. या साऱ्यामुळे न्यायदान म्हणजे एक फार्स आहे, असं सर्वसामान्यांना वाटतं. खालच्या न्यायालयाच्या निकालाविरुद्धच्या अपिलात फारसा दम नसेल, फक्त वेळकाढूपणाचा त्यात प्रयत्न असेल तर वरच्या कोर्टानी ते अपील दाखल करून घेणं, त्यावर तारखा देणं, सुनावणी घेणं हे योग्य आहे काय? त्यामुळे दाव्यांची योग्यता निश्चित करून अत्यावश्यक अपिलांना अनुमती नाकारण्याचं पाऊल न्यायालयांनी उचलणं योग्य ठरेल.

एक मुद्दा आहे न्यायप्रक्रियेतील क्लिष्टतेचा. एखादं प्रकरण न्यायालयात दाखल करण्यापासून प्रत्यक्ष खटला उभा राहीपर्यंत जाणारा वेळ आणि पक्षकाराची होणारी पिळवणूक या साऱ्याचा विचार करता एकदा खटला सुरू झाला की तो लवकरात लवकर कसा निकालात निघेल, हे पाहिलं गेलं पाहिजे. एकेका दिवशी दोन-दोन, पाच-पाच तास त्या खटल्याचं काम चाललं पाहिजे, त्यासाठी सलग तारखा दिल्या गेल्या पाहिजेत व तो खटला हातावेगळा केला गेला पहिजे. त्या खटल्याशी संबधित सगळ्यांनीच अशी भूमिका घेतली, तर न्यायावरचा विश्वास दृढ होऊ शकेल.

दुसरी गोष्ट म्हणजे, बऱ्याच प्रकरणांत एखाद्या गोष्टीबाबत संबधित सरकारी खात्याकडून त्यांचं म्हणणं न्यायालयाकडून मागितलं जातं, हे म्हणणं लिखित स्वरूपात मिळण्यात मोठा विलंब होतो व त्यामुळे प्रकरणं प्रलंबित राहतात. हे टाळण्यासाठी संबधित खात्यांच्या प्रमुखांवर हे बंधन घालण्यात आलं पाहिजे, की न्यायालयाकडून करण्यात आलेल्या मागणीला विशिष्ट कालावधीत त्यांनी उत्तर दिलंच पाहिजे. त्याचप्रमाणे साक्षीदार, वकील, पोलीस अधिकारी या सर्वांच्याच जाबाबदाऱ्या बंधनकारक बनवल्या पाहिजेत. आणखी एक महत्त्वाचा मुद्या असा की, न्यायालयीन प्रक्रियेतील दंडात्मक तरतुदी लवचिक बनवल्या पाहिजेत. कामगारांचा महागाई भत्ता जसा महागाईनुसार कमी जास्त होतो, तशा या तरतुदीही कमी-जास्त केल्या गेल्या

पाहिजेत. उदाहरणार्थ, एखाद्या गुन्ह्यात किरकोळ जामिनावर आरोपी मुक्त होऊ शकतो. त्यामुळे गुन्ह्याच्या गांभीर्यानुसार जामिनाची रक्कम कमी-जास्त असायला हवी, जेणेकरून गंभीर गुन्ह्यातील आरोपी सहजी मुक्त होऊ शकणार नाही.

सर्वसाधारणपणे इन्कम टॅक्स, एक्साईज ड्युटी आदी कायद्यांमध्ये दरवर्षी बदल होतात. उदा. वार्षिक अर्थसंकल्पात वेगवेगळ्या कॅटॅगरींनुसार इन्कम टॅक्सच्या दरांमध्ये बदल केले जातात, सवलती दिल्या जातात किंवा काढून घेतल्या जातात, वगैरे. या बदलांचा कोणाला लाभ मिळतो, तर कोणावर आर्थिक बोजा पडतो. त्यामुळे न्यायालयांमध्ये याचिका दाखल होतात. वेगवेगळे कायदेशीर प्रश्न उपस्थित केले जातात व त्यासंदर्भात न्यायालयांकडे धाव घेतली जाते. परिणामी, न्यायालयांमधील प्रकरणांची संख्या वाढते. कधी कधी आधीच्या याचिका, कायदेशीर प्रश्न-पेच आदींबाबत सुनावणी सुरू होईपर्यंत नव्या वर्षाच्या अंदाजपत्रकांची वेळ येते. विविध करांच्या संदर्भात दीर्घकालीन धोरण आखण्यास व त्यानुसार कायद्यात दीर्घकाळासाठी बदल केल्यास, न्यायव्यवस्थेवरील हा ताण कमी होऊ शकतो.



'न्यायालयीन कार्यवाहीत होणारा विलंब' ही एक गोष्ट पण न्यायालयीन कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व न्यायालयाने निकाल दिल्यानंतर त्या निकालांची अमंलबजावणी योग्य वेळेत होणंही महत्त्वाचं ठरतं. या अंमलबजावणीला विलंब झाल्यास समाजात चुकीचे संदेश जातात. खालच्या न्यायालयाच्या निकालानंतर आरोपी वरच्या न्यायालयांत अपील करतात, हा मुद्दा आधी आपण पाहिला आहे. पण सर्व अपिलांमधून प्रकरण गेल्यानंतर आणि सर्वच अपील न्यायालयांनी शिक्षेला मंजुरी दिल्यानंतर किंवा त्यात आवश्यक ते बदल केल्यानंतर त्या निकालाची अंमलबजावणी त्वरेने झाली पाहिजे. तसं झालं नाही, तर न्यायालयांच्या निकालाची कदर होत नाही, अशी लोकांची भावना होऊ शकते.

मध्यंतरी चीनमध्ये दुधाच्या भुकटीत झालेल्या भेसळीबद्दल या भेसळीस जबाबदार असणाऱ्या व्यक्तींचा तपास लावून त्यांना न्यायालयासमोर आणण्यात आलं,

न्यायालयाने खटला चालवून त्यांना फाशीची शिक्षा सुनावली व ती सहा महिन्याच्या आत अमलातही आली. आपल्याकडे संसदेवर हल्ला होतो मुंबईत दहशतवादी हल्ले करतात निष्पाप लोकांचे बळी जातात, अनेक दिवस खटले चालतात, आरोपी मजेत राहतात. त्यांना झालेल्या शिक्षेची अंमलबजावणी लांबणीवर पडते. ब्रिटिश काळात राजा राममोहन रॉय यांनी सतीची प्रथा बंद करण्यात पुढाकार घेतला. तेव्हाचे ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड बेंटिंग यांनी ही प्रथा बंद करण्याच्या निर्णयात जात, धर्म आणि राजकारण येऊ दिलं नाही. त्वरित निर्णय घेतला व ही रूढी बंद झाली. आज कायदे होतात पण अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे कायद्याचा उपयोग काय, असा प्रश्न पडतो.

अलीकडे समाजात आर्थिक गुन्ह्यांचं प्रमाण वाढलं आहे. आर्थिक गुन्ह्यांचं स्वरूप पाहिलं तर त्या प्रकारचं ज्ञान, त्या प्रकारचं आकलन, त्यातील खाचाखोचांची जाण सगळ्यांना असतेच असं नाही. बऱ्याचदा वेगवेगळ्या पळवाटा शोधून आर्थिक गुन्हेगार मोकाटच सुटतात. या शिवाय या गुन्ह्यांकरता होणाऱ्या शिक्षाही कमी कालावधीच्या असतात. त्यामुळे या शिक्षांच्या तरतुदींमध्ये वाढ झाली पाहिजे. महाराष्ट्रात विदर्भ-मराठवाड्यात आर्थिक विवंचनेपोटी हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बनावट उद्योग करून दुसऱ्याचे पैसे खिशात घालणारे 'हपापाचा माल गपापा' करणारे मोकाट सुटणं किंवा त्यांना किरकोळ शिक्षा होणं हे योग्य आहे काय? आज भ्रष्टाचाराचा पैसा वेगवेगळ्या हातातून जात शेवटी ज्या 'किंगपिन' पर्यंत पोहचतो. तिथपर्यंत यंत्रणा पोहचूच शकत नाही. वरवरचे मासे गळाला लागतात आणि त्यांना किरकोळ शिक्षा होतात; पण सूत्रधार मुक्तच राहतात. सामान्य जनतेच्या कष्टाचा व घामाचा पैसा कोणी लुटत असेल तर त्याला अतिशय कठोर शिक्षा झाली पाहिजे. लुटलेला प्रत्येक पैसा परत मिळाला पाहिजे. जेव्हा असे घडेल तेव्हाच आपण म्हणू शकू की, देशात कायद्याचं पालन होत आहे.

शासन व्यवस्था आणि अर्थव्यवस्था शासनाचे वेगवेगळे विभाग असतील, कायदा व्यवस्था असेल, त्या प्रत्येकाची जबाबदारी निश्चित करणारा कायदा केला गेला पाहिजे. व्यवस्थेत एखादी चूक घडली आणि त्यामुळे विपरीत परिणाम घडले तर याची जबाबदारी कोणाची? अगदी विपरीत परिणाम नाही घडले तरीही झालेल्या चुकीची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. चूक का घडली, कशामुळे घडली याची चौकशी झाली पाहिजे. जबाबदार व्यक्तीला योग्य ती शिक्षा झाली पाहिजे आणि भविष्यात पुन्हा अशा चुका होणार नाहीत याचा विचार झाला पाहिजे, तरच चुका टळू शकतील, दिरंगाई

टळू शकेल, कामं वेळेत होतील व त्यामुळे देशाच्या प्रगतीला गती मिळेल.

केवळ शासन व्यवस्थेला जबाबदार बनवणारे कायदे झाले पाहिजेत, असं नाही तर नागरिकांना जबाबदार बनवणारे देखील कायदे झाले पाहिजेत. नागरिकांचे हक्क जसे त्यांना मिळाले पाहिजेत तसंच त्यांच्या कर्तव्यांची जाणीवही त्यांना असली पाहिजे. प्रत्येक नागरिक समाजाला आणि देशाला उत्तरदायी असला पाहिजे. उदाहरणार्थ, लाच घेणं हा जसा गुन्हा आहे, तसाच लाच देणं हा सुद्धा गुन्हा आहे. जर एखादा नागरिक आपल्या चुका, आपला गुन्हा दडपण्यासाठी संबधित यंत्रणेतील अधिकाऱ्यांना पैशाचं आमिष दाखवत असेल, तर त्याच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे, त्याच्यावर खटला चालला पाहिजे व त्याला शिक्षा झाली पाहिजे. एखादा नागरिक खोटी साक्ष देत असेल व त्यामुळे एखाद्या व्यक्तीला नाहक त्रास होत असेल, तिचे नुकसान होत असेल व संबधित यंत्रणा वेठीस धरली जात असेल, तर त्या नागरिकाला शिक्षा झाली पाहिजे. कायद्यात याबाबतीत तरतुदी असतात, पण या स्वरूपाचे फारसे खटले दिसून येत नाहीत. सार्वजनिक ठिकाणी घाण करणे, लोकांना उपद्रव होईल असं वर्तन करणे या गोष्टींबाबत कठोर कारवाई झाली पाहिजे, जेणेकरून नागरिकांमध्येही शिस्त निर्माण होईल.

लोकांना त्यांनी मिळवलेला पैसा राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था किंवा शेड्युल्ड बँका अशा वित्तसंस्थांमध्येच ठेवण्याची परवानगी देणारा कायदा होणं गरजेचं आहे, असं मला वाटतं. किंबहुना, व्यक्तीने कोणत्याही एकाच बँकेत, एकाच खात्याद्वारे सर्व आर्थिक व्यवहार करावेत, असा नियम केला गेला पाहिजे. त्यामुळे व्यक्तीचे आर्थिक व्यवहार स्पष्ट राहतील. त्यांची तपासणी शक्य होईल. आज लोकं वेगवेगळ्या बँकातून खाती उघडतात, पत्नीच्या, मुलांच्या नावाने व्यवहार करतात. आयकर बुडवण्यासाठी आपली संपत्ती दडवण्याचा प्रयत्न करतात. या करचोरीला या नियमामुळे बऱ्याच प्रमाणात आळा बसू शकेल, तसंच वेगवेगळ्या प्रकारच्या आर्थिक गुन्ह्यांना देखील आळा बसू शकतो.

व्यक्तीच्या धन व संपत्तीच्या संचयाबाबतही काही एक स्वरूपाचा कायदा व्हायला हवा, असं मला वाटतं. समाजात जी विषमता दिसून येते त्यामागे धन व संपत्ती संचय हेही एक कारण आहे. आज एखाद्या व्यक्तीची संपत्ती तिच्या मृत्यूनंतर तिच्या वारसांना मिळते त्यामुळे एका व्यक्तीने केलेला संचय तसाच पुढे त्याच्या वारसदारांकडे हस्तांतरित होतो. समाजाला त्याचा उपयोग होत नाही. माझं मत आहे

की, सरकारने व्यक्तीच्या उत्पन्नावर कोणतंही बंधन घालू नये तसंच त्याच्या उत्पन्नांचा भोग त्याने कसा घ्यावा यावरही बंधन घालू नये. मात्र, त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्ती व मालमत्तेचा अर्धा हिस्सा सरकारजमा होईल व उर्वरित अर्धा हिस्सा व्यक्तीने निश्चित केलेल्या वारसदारांकडे हस्तांतरित होईल, असा कायदा करावा. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीकडे त्याच्या मृत्यूच्या वेळी पाच लाख रुपये असतील, तर त्यातील अडीच लाख रुपये सरकार जमा होतील व उर्वरित अडीच लाख रुपये त्याच्या वारसाला मिळतील यासाठी त्या व्यक्तीने मृत्युपत्र बनवणं अनिवार्य करावे. याचा फायदा असा होऊ शकतो की, सरकारजमा झालेल्या अशा पैशांच्या उपयोग गरिबांच्या सक्षमीकरणांच्या योजनांकरता सरकार करेल, एखाद्याने आयुष्यात शंभर एकर जमीन कमावली असेल, तर त्यातील पन्नास एकर जमीन परत शासनाकडे येईल व गरजू शेतकऱ्यांना ती उपलब्ध होईल. माणूस बऱ्याचदा हव्यासापोटी संचय करतो, पण त्याचा उपयोग करत नाही. शंभर एकर जमीन तो खरेदी करतो, पण त्यातील फक्त पंचवीस टक्केच उपयोगात आणतो. उरलेली पंच्याहत्तर टक्के जमीन नुसती पडून राहणं आपल्यासारख्या विकसनशील समाजाला परवडण्यासारखं नाही. त्यामुळे साधनसंपत्ती नुसती पडीक ठेवणं हा गुन्हा मानला जावा.

आज शहरात प्लॉट्स दिसतात, तिथे कचराकुंडी तयार होते. काँग्रेसगवत वाढतं. हा प्लॉट मोकळा ठेवायचा असेल तर त्याभोवती चारही बाजूला झाडं लावली पाहिजेत. मधल्या मोकळ्या जागेत बाग केली पाहिजे, तिथे मुलांना खेळू दिलं पाहिजे असा कायदा व्हायला हवा. रस्त्यावर अनेक मोटारी, ट्रक्स केवळ उभे करून ठेवलेले दिसतात. त्यावर गंज चढलेला दिसतो. त्या भंगार झालेल्या दिसतात. अशा भंगार गोष्टी रोगराईस कारणीभूत ठरतात त्यामुळे त्या सरकारजमा करण्याचा कायदा व्हावा. सरकारने यातील चालू स्थितीतील गोष्टी गरजू लोकांना द्याव्यात तसंच रिसायकलिंगद्वारे उपयोगात आणाव्यात. कोणत्याही संचित वस्तूचा समाजासाठी उपयोग झाला पाहिजे, असं मला वाटतं.

आपण पाहतो की, समाजात घटस्फोटाचं प्रमाण वाढलं आहे विवाह कायद्याद्वारे घटस्फोट मिळू शकतो, पण तो सहजपणे मिळू शकेल अशी भूमिका नको असं मला वाटतं. कौटुंबिक व सामाजिक स्वास्थ्यासाठी हे योग्य नाही. घटस्फोटाला मंजुरी देताना पोटगी वगैरेच्या अटी घतल्या जातात; पण बऱ्याचदा स्त्रीला पोटगी वेळेवर मिळत नाही. यासाठी तिला न्यायालयाची मदत घ्यावी लागते. न्यायालयात खेटे घालावे

लागतात. याबाबतीत पोटगीची रक्कम आगाऊ न्यायालयाकडे जमा करण्याचा नियम करायला हवा. स्त्रीला जर पोटगी मिळाली नाही, तर ती न्यायालयांकडून मिळेल, अशी तरतूद करायला हवी. न्यायालयांनासुद्धा आर्थिकदृष्ट्या सक्षम कसं बनवता येईल, याचा विचार व्हायला हवा. मला असंही वाटतं की, न्यायालयाचं महत्त्व शालेय वयात विद्यार्थ्यांवर बिंबवायला हवं. त्यासाठी लहान मुलांच्या सहली न्यायालयात न्यायला हव्यात. न्यायालयाचं कामकाज त्यांना समजून सांगायला हवं. भावी नागरिक यादृष्टीने त्यांना नैतिकतेचे धडे मिळतील अशी व्यवस्था करायला हवी.

पर्यावरणविषयक कायदेसुद्धा कठोर झाले पाहिजेत. आज पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होतोय. हवामानात बदल घडताहेत त्यामुळे भविष्यात कदाचित अन्नाधान्याच्या तुटवड्याशी सामना करण्याची वेळ येईल. हे लक्षात घेऊन आपल्या कामांच्या पद्धतीचा पुनर्विचार झाला पाहिजे. त्यासंबधी नियम बनवले गेले पाहिजेत व त्यांचं काटेकोरपणे पालन होईल, हे बघितलं गेलं पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे पर्यावरणाच्या संवर्धनाकरता मनुष्यबळ उपलब्ध केलं पाहिजे. शाळा-कॉलेजात जाणारी तरुण मुलं-मुली, ज्यांच्यामध्ये कामाचा उत्साह आहे, त्यांचा उपयोग यासाठी करून घेता येईल. हा उपयोग निश्चित करण्यासाठी नियम करावे लागतील. तरुण मुलांची आयुष्यातील काही वर्षं देशकार्यासाठी देण्याबाबत कायदा झाला, तर त्याचा फार मोठा फायदा देशाला होऊ शकतो.

कायद्याचा भंग केल्याबद्दल, गैरकृत्यं केल्याबद्दल चुका केल्याबद्दल शिक्षा कशा असल्या पाहिजेत? चीनमध्ये गुन्हेगारांना रस्त्यावर उभे करून गोळ्या घालतात किंवा अरब देशांमध्ये भर चौकात चाबकाचे फटके मारले जातात. अशा क्रूर शिक्षा असाव्यात, असं मला वाटत नाही, पण समाजाचं नुकसान करणाऱ्या गुन्हेगाराचा-उदाहरणार्थ भ्रष्टाचारी, बलात्कारी व्यक्तीला भर चौकात पिंजऱ्यात कोंडून का ठेवू नये? लोक येता-जाता त्याला पाहतील व त्याला स्वतःचीच लाज वाटेल. स्वतःच्या कृत्याचा त्याला पश्चात्ताप होईल व त्याच्यात सुधारणा घडण्याची शक्यता निर्माण होईल. शिवाय गुन्हेगारांना काय शिक्षा होऊ शकते, हे लोक पाहतील व त्या मार्गाकडे जाण्यापासून परावृत्त होतील, हे माझं एक मत आहे, असो.

मात्र गुन्हेगाराला सुधारण्याची संधी देणारे कायदे झाले पाहिजेत. वाल्या कोळ्याचा वाल्मीकी झाला, हे आपल्याला माहीतच आहे. सुधारण्याची सुसंधी गुन्हेगाराला मिळाली पाहिजे. प्रामाणिकपणा, निष्ठा, समर्पण या गोष्टी वरून-खाली

झिरपतात, असं मानलं जातं, त्या खालून वरपर्यंत पोहचतील, अशा दृष्टिकोनातून कायदे व शिक्षा अमलात यायला हव्यात.

कायद्यांबद्दल, न्यायव्यवस्थेबद्दल मला प्रचंड आदर आहे. परंतु कायद्याचं पालन नीट होत नसल्यामुळे येणारी असभ्यता असंस्कृतपणा आपण पाहतो. यामुळे आपण असुरक्षित बनू शकतो. शेवटी कायदा कोणासाठी असतो? माणसासाठीच ना? म्हणजेच कायद्याच्या मागचा माणूस महत्त्वाचा. कायद्याने त्याच्या लाभाचा विचार केला पाहिजे. कायदा राबवणाऱ्या नोकरशहांनी कायद्याचा लाभ लोकांपर्यंत जास्तीत जास्त कसा पोहचेल, याचा विचार केला पाहिजे. दुसरं म्हणजे लोकांनाही कायदा साक्षर बनवलं पाहिजे. अगदी पहिलीपासून नागरिकशास्त्र या विषयाद्वारे मुलांना कायदा समजावून सांगितला पाहिजे. कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी आम शिक्षणातूनही शिकवल्या पाहिजेत. त्यामुळे समाजात कायदा साक्षरता सुधारेल, विवेक वाढेल. कायद्याचा चुकीचा उपयोग कमी होईल. मला असंही वाटतं की, कायदा सर्वांसाठी समान असला तरी, सुशिक्षित, उच्चशिक्षित व्यक्तीने जर कायदा मोडला, गुन्हा केला तर त्याला अशिक्षित किंवा अल्पशिक्षित व्यक्तीपेक्षा कठोर शिक्षा झाली पाहिजे; कारण ती व्यक्ती कायद्याची जाणती असू शकते, कायदा समजण्याइतकी सक्षम असते. कायद्याचं उल्लंघन करणं हे गैर आहे, हे त्याला माहीत असतं. तो समाजातला जबाबदार घटक असतो. त्याने चुकीचं वर्तन करणं अपेक्षित नसतं. कायद्याचा धाक निर्माण होण्यासाठी मला हे आवश्यक वाटतं.

कायद्याचं राज्य म्हणजे 'रामराज्य' असं आपण मानतो. असं राज्य कधी येईल? जेव्हा राम असेल तेव्हाच. हा राम कुठे असेल? एकतर राम प्रत्यक्षात असेल, नाहीतर राम कायद्यात असेल. राम काय आहे? खारुताईच्या कामाची प्रशंसा करणारा, तिला शाबासकी देणारा राम आणि रावणाला शिक्षा देणारा राम! रामाची ही दोन रूपं आहेत. ही एक आदर्श व्यवस्था आहे. अशी व्यवस्था साकारायची असेल, तर कायदा परिपूर्ण झालाच पाहिजे.